<u>प्रेसनोट</u>

दि.२३/०६/२०२०

# घोडेगांव तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागाच्या संगणक ऑपरेटर व पुरवठा निरीक्षक यांचेवर रेशनकार्डासाठी लाच मागणी केल्या प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | घोडेगांव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण, गु.र.नं. १३६/२०२० |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७,१२ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - श्रीमती जयश्री शेंगाळे.<br>संगणक ऑपरेटर (कंत्राटी )<br>२) लोकसेवक - अनिल भाऊराव पाटील.<br>पुरवठा निरीक्षक वर्ग-२, पुरवठा विभाग,<br>तहसील कार्यालय ता. घोडेगांव जिल्हा पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३००/- (तीनशे रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- ०६/०३/२०२०,<br>गुन्हा दाखल दिनांक :- २२/०६/२०२०<br><br>यातील तक्रारदार यांनी दुबार रेशनिंग कार्ड काढण्यासाठी अर्ज केला होता. त्यावरून तक्रारदार यांना दुबार रेशनिंग कार्ड देण्याकरिता लोकसेवक आरोपी क्रमांक १ यानी शासकीय फि २०/- रूपये असताना ३००/- रूपयांची लाचेची मागणी केली. व लाच मागणीस लोकसेवक आरोपी क्रमांक २ यानी प्रोत्साहन दिले म्हणून वरिलप्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हयाचा तपास पोलीस उपअधीक्षक श्रीमती प्रतिभा शेंडगे या करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. अॅन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट- www.acbmaharashtra.gov.in

सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.